**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे**
**कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला,**
**१, बी.जे. रोड, पुणे-०१**

दुरध्वनी क्र. ०२०- २६१२२८४६/४७ Email:- agricredit16@gmail.com

जा.क्र.कृषीपत-६/कर्जमाफी/अंमलबजावणीपरिपत्रक/११२४/२०२६ दिनांक : ०३-०६-२०२६

# परिपत्रक

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना -२०२६

**संदर्भ** :शासन निर्णय क्रमांक कृकमा ०५२६/प्र.क्र.९३/का.२स, दि. ०२/०६/२०२६.

संदर्भीय शासन निर्णय दि. ०२/०६/२०२६रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे.या योजनेअंतर्गत अर्थसहाय्यामध्ये खालील आर्थिक घटकांचा समावेश आहे.

**१) प्रस्तावना :-**

**अ) कर्जमुक्ती योजना :**

ज्या शेतकऱ्यांनी दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२५ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पिक कर्ज/ या कालावधीत वाटप केलेल्या अल्पमुदत पिककर्जाचे पुनर्गठन / फेरपुनर्गठन करून मध्यम मुदत कर्जात रूपांतर केलेल्या कर्जामधील दि. ३०.०९.२०२५ रोजी थकीत असलेल्या व दि. ३१.०३.२०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या थकीत हप्त्यांची मुद्दल व व्याजासह अधिकतम रक्कम रु. २.०० लाखापर्यंत असल्यास अशा शेतकऱ्यांना रू. २.०० लाख महत्तम मर्यादेपर्यंत कर्जमुक्ती योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

**ब)एकवेळ समझोता योजना (OTS)**

ज्या शेतकऱ्यांनी दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२५ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पिक कर्जाचे/ या कालावधीत वाटप केलेल्या अल्पमुदत पिककर्जाचे पुनर्गठीत / फेरपुनर्गठन करून मध्यम मुदत कर्जात रूपांतर केलेल्या कर्जामधील दि. ३०.०९.२०२५ रोजी थकीत असलेल्या व दि. ३१.०३.२०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या थकीत हप्त्यांची मुद्दल व व्याजासह अधिकतम रक्कम रु. २.०० लाखापेक्षा जास्त असल्यास अशा शेतकऱ्यांने प्रथम रू. २.०० लाखापेक्षा जास्त असलेली थकीत रकमेची परतफेड करणे आवश्यक असेल. अशी रक्कम परतफेड केल्यानंतर पात्र शेतकऱ्याला एकवेळ समझोता योजने अंतर्गत (OTS) रु. २.०० लाख रकमेचा लाभ देण्यात येणार आहे.

**क) प्रोत्साहनपर लाभ योजना.**

सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पिक कर्जाची उचल करून वर्ष संपल्यानंतर दि. ३० जून पुर्वी किंवा बँकेचे प्रचलीत नियमानुसार विहीत वेळेत

यापैकी जी नंतरची असेल, त्या दिनांकापुर्वी कर्जाची परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या हेतूने प्रती शेतकरी रु. ५० हजार इतक्या अधिकतम रकमेपर्यंत लाभ देण्यात येणार आहे. सन २०२३-२४ अथवा सन २०२४-२५ या वर्षात घेतलेल्या व त्याची पुर्णत: परतफेड केलेल्या अल्पमुदत पिक कर्जाची रक्कम रू. ५० हजार पेक्षा कमी असल्यास, अशा शेतकऱ्यांना त्यांनी सन २०२३-२४ अथवा सन २०२४-२५ या वर्षात प्रत्यक्ष परतफेड केलेल्या अल्पमुदत पिक कर्जाच्या मुद्दल व व्याजासह परतफेड केलेली रक्कम, किंवा किमान रू. ५ हजार रक्कम प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

**२) योजना अंमलबजावणीचे टप्पे पुढीलप्रमाणे :**

या योजनेची अंमलबजावणी शासनाने विहीत केलेल्या कालमर्यादेत करावयाची आहे.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | शासन निर्णयातील निकषांनुसार बँकांकडून माहिती भरून घेणे. | दि. ०३.०६.२०२६ ते दि. ०७.०६.२०२६ |
| २ | जि.म. स. बँकांच्या/ विकास संस्थांच्या कर्जखात्यांची तपासणी. | दि. ०३.०६.२०२६ ते दि. २०.०६.२०२६ |
| ३ | कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर सादर/अपलोड करणे. | दि. १०.०६.२०२६ ते दि. २०.०६.२०२६ |
| ४ | कर्जखात्यांच्या माहितीचे संगणकीय संस्करण | दि. २०.०६.२०२६ ते दि. ०३.०७.२०२६ |
| ५ | योजना निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांची आधार प्रमाणीकरणासाठीची यादी प्रसिध्द करणे. | दि. ०६.०७.२०२६ |

सदर योजनेमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सर्व पीक कर्ज खाते तपासणे आवश्यक असल्याने यासाठी बँकाकडून कर्ज खात्यांची माहिती संकलीत करणे, विविध प्राधीकारी/ आस्थापनांकडून शासन निर्णयाद्वारे कर्जमाफीस अपात्र असलेल्या व्यक्तींची माहिती संकलीत करणे, विविध बँका व शासकीय कार्यालयाशी समन्वय साधून योजनेस आवश्यक माहिती संकलीत करणे, तसेच विविध बँकांना कर्जखात्यांची माहिती योजनेच्या संगणकीय प्रणालीवर सादर करण्यासाठी मार्गदर्शन करणे व त्यांच्याशी समन्वय साधणे आवश्यक आहे. यासाठी खाली नमुद केल्याप्रमाणे समितीचे गठन करण्यात येत आहे.

**३ अ) राज्यस्तरीय नियंत्रण समिती.**

योजनेच्या अंमलबजावणी करीता राज्यस्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिपक तावरे, भा.प्र.से.,सहकार आयुक्त व निबंधक | समिती अध्यक्ष |
| २ | श्री. नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक | सदस्य |
| ३ | श्री.राजेश सुरवसे, अपर निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ४ | श्री.मिलिंद भालेराव, अपर निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ५ | श्री.सचिन रावल, अपर निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ६ | श्री. तुषार काकडे, अपर निबंधक (लेखापरीक्षण) | सदस्य |
| ७ | श्री. राम शिर्के, विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) | सदस्य |
| ८ | श्री बाळासाहेब बडाख, सहनिबंधक, (लेखापरीक्षण) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. कैलास जेबले, जिल्हा उपनिबंधक, पुणे शहर | सदस्य |
| १० | श्री. दिगंबर साळुंखे, उपनिबंधक, से. नि. (मुख्यालय) | सदस्य |
| ११ | श्री. मनोहर माळी, उपनिबंधक, (मुख्यालय) | सदस्य सचिव |

राज्य स्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१. राज्यातील योजना अंमलबजावणी कामकाजाचा आढावा घेणे व नियंत्रण ठेवणे.

२. योजना अंमलबजावणी करीता प्रशिक्षण, प्रचार व प्रसिध्दी करणे.

३. योजना अंमलबजावणीचे अनुषंगाने धोरणात्मक मुद्यावर शासन संमतीने निर्णय घेणे.

४. योजना अंमलबजावणी करीता आवश्यक ते सर्व निर्णय घेणे.

**ब) विभागस्तरीय समिती.**

योजना अंमलबजावणीकरीता विभागस्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन) | अध्यक्ष |
| २. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) | सदस्य |
| ३. | विभागीय उप/ सहायक निबंधक, सहकारी संस्था | सदस्य सचिव |

समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे :

१. संबंधीत विभागातील योजना अंमलबजावणी कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

२. कर्जखात्यांच्या तपासणी कामकाजाच्या प्रगतीचा नियमीत आढावा घेणे व जिल्हयामध्ये तपासणीसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग करणेची कार्यवाही करणे.

३. योजना संगणकीय प्रणालीवर कर्जखात्यांची माहिती सादर करण्यासाठी अद्यावत राहील याची खातरजमा करणे.

**क) जिल्हास्तरीय समिती (प्रत्येक जिल्हयासाठी) :**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, | समिती अध्यक्ष |
| २ | जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था | सदस्य |
| ३ | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक | सदस्य |
| ४ | जिल्हा नोडल अधिकारी, व्यापारी बँका | सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | सदस्य |
| ६ | सहायक निबंधक, सहकारी संस्था (जिउनि नियुक्त) | सदस्य सचिव |

जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे :

१. संबंधीत जिल्हयामध्ये योजना अंमलबजावणी करणे.

२. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पात्र शेतकऱ्यांची माहिती शासकीय लेखापरीक्षकांमार्फत तपासणी करुन महाआयटीच्या पोर्टलवर अपलोड करणे.

३. कर्जखात्यांच्या तपासणी कामकाजाच्या प्रगतीचा नियमीत आढावा घेणे व जिल्हयामध्ये तपासणीसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग करणेची कार्यवाही करणे.
४. संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिध्द करणे व आधार प्रमाणीकरण करणेकामी आवश्यक असल्यास शेतकरी मेळाव्यांचे आयोजन करणे.
५. योजने अंतर्गत प्राप्त कर्जमाफी रकमेचा विकास संस्थेमधील जमाखर्चाचा आढावा घेणे.
६. योजने अंतर्गत प्राप्त कर्जमाफी रकमेचे विनियोग दाखले प्राप्त करून घेणे.
७. योजने अंतर्गत कामकाजाची विविध टप्प्यावरील कार्यवाहीस प्रसिध्दी देणे.

विभाग व जिल्हा समितीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याकरीता खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | नेमुन दिलेला विभाग |
|---|---|---|
| १ | श्री. नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | नागपूर व अमरावती |
| २ | श्री. राजेश सुरवसे, अपर निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे | छ संभाजीनगर व पुणे |
| ३ | श्री मिलींद भालेराव, अपर निबंधक, सहकारी संस्था, पुणे | नाशिक व कोकण |
| ४ | श्री. सचिन रावल, अपर निबंधक, सहकारी संस्था, पुणे | लातूर व कोल्हापूर |

समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे :
१. संबंधीत विभागातील योजना अंमलबजावणी कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
२. कर्जखात्यांच्या तपासणी कामकाजाच्या प्रगतीचा नियमीत आढावा घेणे व जिल्हयामध्ये तपासणीसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा वर्ग होईल हे पाहणे.

**४)योजनेच्या अनुषंगाने अपात्र व्यक्तींची माहिती संकलीत करण्यासाठीची समिती.**

योजेनमध्ये अपात्र असलेल्या सर्व व्यक्तींची माहिती संकलित करुन महाआयटीच्या पोर्टलवर अपलोड करण्याकरीता श्री. एस. एम. पाटील, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती कार्यरत राहील.

**अ) अपात्र व्यक्तींची सहकारी संस्थांकडील माहिती संकलनासाठी खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेत येत आहे.**

| अ.क्र. | नाव | कामकाजाचा तपशील |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश अष्टेकर, सहसंचालक, (साखर) | सहकारी साखर कारखान्यांकडील पदाधिकारी संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| २ | श्रीमती प्रज्ञा तायडे, सहनिबंधक (दुग्ध) | सहकारी दुध संघांकडील पदाधिकारी संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ३ | श्रीमती सीमा पांडे, सहसंचालक (वस्त्रोद्योग) | सहकारी सुतगिरणी पदाधिकारी संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ४ | श्रीमती स्नेहा जोशी, सहसंचालक (पणन) | कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ५ | श्री. मनोहर माळी, उपनिबंधक, | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे पदाधिकारी संचालक, अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | (कृषिपत) | व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ६ | श्री. राजेंद्र खंडाईत, उपनिबंधक, ना.बँका, पुणे | नागरी सहकारी बँकाकडील पदाधिकारी संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |

या समितीने या कार्यालयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली पुढील बाबीवर कामकाज करावे.

१. शासन निर्णयात नमुद केलेल्या अपात्र व्यक्तींची माहिती संकलित करणे.

२. मंत्रालय स्तरावरील माहिती मिळणेकामी आवश्यक तो पत्रव्यवहार करणे.

३. महाआयटीद्वारे तयार करण्यात आलेल्या पोर्टलवर सदरची माहिती विविध प्राधिकारी/आस्थापनाद्वारे दि.२०.०६.२०२६ पुर्वी अपलोड करुन घेणे.

ब) सहकारी संस्था व्यतिरिक्त इतर सर्व अपात्र व्यक्तींच्या बाबत इतर सर्व अपात्र व्यक्तींच्या बाबत माहिती संकलन व पोर्टलवर अपलोड करण्याकरीता खालीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | कामकाजाचा तपशील |
|---|---|---|
| १ | श्री. शिरीष सपकाळ, जिउनि, मुंबई (२)<br>श्री. अजय भालके, सहा.निबंधक,एस विभाग, मुंबई | महानगर पालीका, नगरपालीका व नगर पंचायत यांचेकडील अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| २ | श्री. राजेश लव्हेकर, जिउनि, मुंबई (४)<br>श्री. फैय्याज मुलानी, उपनिबंधक, मुंबई | जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीकडील अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ३ | श्री. आनंद कटके, जिउनि, मुंबई (३)<br>श्रीमती भारती काटोळे, एच/पुर्व सहायक निबंधक मुंबई | आयकर विभागासोबत समन्वय साधणे, कराराबाबतची कार्यवाही करणे, तसेच अपात्र व्यक्तींबाबतची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ४ | श्री. संजय गाडे पाटील, उपनिबंधक, मुंबई<br>श्री.संदिपान मते, सहायक निबंधक, बी विभाग मुंबई | महाराष्ट्र राज्यातील विद्यमान /भूतपुर्व मंत्री/ राज्यमंत्री, विद्यमान/ भूतपुर्व लोकसभा/ राज्यसभा सदस्य, विद्यमान/ भूतपुर्व विधानसभा/ विधान परिषद सदस्य यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ५ | श्री. बजरंग जाधव, उपनिबंधक, मुंबई<br>श्री.शामराव दडस, सहायक निबंधक, सी विभाग ,मुंबई | केंद्र व राज्य शासनाचे शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांची तसेच निवृत्ती वेतन धारकांची (रु. २५००० पेक्षा जास्त निवृत्ती वेतन घेणारे) माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |
| ६ | श्री. विजय गवळी, उपनिबंधक, मुंबई<br>श्री. अरुण चौगुले, सहा. निबंधक, मुंबई | सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम ( महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ इ. ) यांचेकडील अधिकारी व कर्मचारी यांची माहिती महाआयटी यांना उपलब्ध करून देणे. |

**५) राज्यस्तरीय तपासणी सनियंत्रण समिती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील शेतकऱ्यांच्या माहितीचे तपासणीचे काम करुन घेण्याकरीता खालीलप्रमाणे राज्यस्तरीय तपासणी सनियंत्रण समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.तुषार काकडे, अपर निबंधक (लेखापरीक्षण) | अध्यक्ष |
| २ | श्री. राम शिर्के, विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री. बाळासाहेब बडाख, सहनिबंधक (लेखापरीक्षण) | सदस्य |
| ४ | श्री. पांडुरंग मोहळकर, विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ | सदस्य |
| ५ | श्री. संजय शेलार, विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ | सदस्य |
| ६ | श्री. दत्तात्रय डोके, विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ | सदस्य सचिव |

समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे :

१. जिल्हा मध्यवर्ती बँकांकडील त्याचप्रमाणे प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांकडील कर्ज खात्यांची तपासणी दि. ०५/०६/२०२६ ते दि. २०/०६/२०२६ या कालावधीत पुर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे.

२. कर्जखात्यांच्या तपासणीसाठी जिल्हा स्तरावर लेखापरीक्षक/ सहकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे नियोजन करणे.

३. ज्या जिल्हयामध्ये कर्जखात्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे, अशा जिल्हयामधील तपासणी कामकाजासाठी आवश्यकतेनुसार लगतच्या जिल्हयातील/दुग्ध, पणन, साखर इ. विभागाकडील कर्मचाऱ्यांचीसेवा उपलब्ध करून देणे.

४. तपासणी कामकाजाचा नियमीत आढावा घेवून, त्याबाबतचा दैनंदिन प्रगती अहवाल मा. सहकार आयुक्त व निबंधक यांना सादर करणे.

**क्षेत्रीय स्तरावर विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ व वर्ग-२, लेखापरीक्षक श्रेणी-१ व श्रेणी-२, उपलेखापरीक्षक यांना कर्जखात्यांच्या तपासणीच्याअनुषंगाने खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.**

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ बाबत शासन निर्णय दि. ०२/०६/२०२६ निर्गमीत करण्यात आलेला आहे. शासन निर्णयात नमुद केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी बँकाकडील थकीत कर्जखात्यांच्या माहिती संकलनासाठी योजनेच्या संगणकीय प्रणालीवर **परिशिष्ठ अ** उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

२. संबंधीत बँक/ संस्थेकडून **परिशिष्ठ अ** मधील संकलीत केलेल्या कर्जखात्यांच्या यादीची प्रत प्राप्त करून घ्यावी.

३. सदरची योजना अल्पमुदत पिककर्जे/ पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जे या कर्जांना लागू आहे. या योजने अंतर्गत मध्य/ दीर्घमुदत कृषि कर्जे लाभास पात्र असणार नाहीत.

४. **अल्प मुदती पिककर्जे**—

अ) अल्पमुदती पिक कर्जामध्ये व्यक्तीगत शेतकऱ्यांना व्यक्तिगत तथा संयुक्त खात्यामध्ये (Joint Account) किसान क्रेडीट कार्डद्वारे दिलेल्या कर्जांचा समावेश आहे.

ब) सोनेतारणावर दिलेली पिक कर्जे, संयुक्त जबाबदारी गटांना (Joint Liability Groups), शेतकरी उत्पादक कंपन्यांना (FPO), शेतकऱ्यांच्या बचत गटांना, शेतकऱ्यांच्या भागीदारी संस्थांना तसेच करारावरील शेती व्यवसायासाठी दिलेली कर्जे या योजनेअंतर्गत लाभास पात्र असणार नाहीत.

५. **पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जे** :

अ) पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जाच्या बाबतीत दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२५ या कालावधीत वितरीत केलेल्या पिक कर्जाचे पुनर्गठन /फेरपुनर्गठन झालेली कर्जखाती विचारात घ्यावीत.

ब) दि. ३०.०९.२०२५ अखेर थकीत असलेले व दि. ३१/०३/२०२६ पर्यंत परतफेड/ वसुल न झालेले पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जाचे हप्ते या योजने अंतर्गत लाभास पात्र राहतील.

क) पुनर्गठन/ फेरपुनर्गठण कर्जाचे वसुलीस पात्र नसणारे हप्ते योजने अंतर्गत लाभास पात्र असणार नाहीत.

ड) दि. ०१/०४/२०१९ पुर्वी वितरीत तथा पुनर्गठीत झालेली कर्जे तसेच दि. ०१/०४/२०१९ पुर्वी पुनर्गठीत झालेल्या पिक कर्जाचे दि. ०१/०४/२०१९ नंतरचे फेरपुनर्गठन/हप्ते या योजने अंतर्गत लाभास पात्र असणार नाहीत.

६. दि. ३०.०९.२०२५ रोजी थकीत असलेली आणि दि. ३१.०३.२०२६ पुर्वी वसुल /नुतनीकरण/बंद झालेली कर्जे, त्याचप्रमाणे दि. ३०.०९.२०२५ नंतर थकीत झालेली कर्जे या योजने अंतर्गत लाभास पात्र असणार नाहीत.

७. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत थेट शेतकऱ्यांना वितरित केलेली अल्पमुदत पिककर्जे/ पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जे तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी विकास संस्थांमार्फत शेतक-यांना वितरित केलेली अल्पमुदत पिककर्जे/ पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जे यांची तपासणी करण्यात यावी.

८. प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा /विकास सेवा सहकारी संस्थांनी स्वभांडवलातून शेतक-यांना वितरीत केलेल्या अल्पमुदत पिककर्जे/ पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जाची तपासणी करण्यात यावी.

९. विकास सेवा संस्था म्हणजे संस्था नोंदणीवेळेस "साधन संपत्ती संस्था" व "कर्ज देणारी साधन संपत्ती संस्था" या वर्गीकरणातील व उपवर्गीकरणातील संस्था आहेत. संस्था नोंदणीनंतर सहकार आयुक्तालयाच्या पूर्वमान्यतेशिवाय वर्गीकरण—उपवर्गीकरण बदलून वरील प्रमाणे वर्गीकरण-उपवर्गीकरण केलेल्या संस्थांची कर्जे या योजनेतंर्गत पात्र असणार नाहीत.

१०. सदर योजनेच्या संगणकीय प्रणालीवर संबंधित संस्थेची दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२५ अखेर वाटप करण्यात आलेली शेतकरी सभासद निहाय सादर केलेली थकित अल्पमुदत पिककर्जे/ पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जाची माहिती / यादी जिल्हा बँकेकडून/ संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी. तसेच सदर यादीमध्ये दि. ३१/०३/२०२६ अखेरचा तपशील नोंदवला असल्याची खात्री करून त्याप्रमाणे तपासणी करण्यात यावी.

११. बँक / संस्था स्तरावरील कर्जविषयक अभिलेख्यांची तपासणी करताना संबंधित शेतकऱ्यांचे कर्जप्रकरण (कर्ज मागणी अर्ज, क.म.पत्रक, कर्जरोखा इ.), कर्ज खात्याचा उतारा, वैयक्तिक कर्ज खतावणी, रोजकिर्द/ प्रमाणके, डीसीबी रजिस्टर, ई. कर्जविषयक अभिलेख्यांची तपासणी करावी.

१२. ज्या प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे दिनांक ३१.०३.२०२६ अखेरचे ई-पॅक्स प्रणालीतुन ई ऑडिट झालेले आहे अशा संस्थांच्या बाबत संगणकीय प्रणालीतील कर्ज व व्याजाच्या बाक्या सदर योजनेसाठी विचारात घेऊन त्याची पडताळणी करण्यात यावी.

१३. कर्जखात्यांची तपासणी करताना संबंधित शेतक-याचे कर्ज हे अल्पमुदत पिककर्जे/ पुनर्गठीत/ फेरपुनर्गठीत कर्जामध्ये समाविष्ट होते किवा कसे, कर्जाचे वितरण दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२५ या कालावधीत झाले आहे किंवा कसे, खात्यावरील व्याज आकारणीचा तपशील, कर्जवसूलीचा तपशील, कर्जबाकी / थकबाकीचा तपशील दि. ३०/०९/२०२५ व दि. ३१/०३/२०२६ अखेर दर्शविण्यात आलेली कर्जबाकी /थकबाकी अचूक आहे किंवा कसे याची खातरजमा करून चुका दुरुस्त करुन घेण्यात याव्यात.

१४. मयत शेतकऱ्याच्या बाबतीत कर्जखात्यास वारस नोंदी केल्या असल्याची तसेच वारसांचा कर्जामधील हिस्सा निश्चीत केला असल्याची खातरजमा करावी.

१५. संस्थेमधील शेतकऱ्यांच्या सभासद क्रमांकाची (Membership ID) खातरजमा सभासद नोंदवहीवरून करावी.

१६. ज्या कर्ज खात्यास संबंधीत शेतकऱ्याच्या आधार क्रमांकाची नोंद केलेली नाही, अशा कर्जखात्यांना (वैयक्तीक/ संयुक्त कर्ज खाते) आधार क्रमांकाची नोंद करण्याबाबत संबंधीत संस्था सचिवास सूचित करावे. त्याचप्रमाणे संबंधीत शेतकऱ्यांकडून आधार क्रमांक प्राप्त करण्यासाठी अशा आधार क्रमांक नसलेल्या कर्जखात्यांची यादी दि. १५/०६/२०२६ पर्यंत प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. अशा सूचने नंतरही आधार क्रमांकाची नोंद न केल्यास अशी कर्जखाती वगळण्यात यावीत.

१७. बँक / संस्थेकडून उपलब्ध झालेल्या यादीवर संस्था सचिव व बँक विकास अधिकारी यांनी यादीच्या प्रत्येक पानावर स्वाक्ष-या कराव्यात. त्याचप्रमाणे सदर यादीची तपासणी करणा-या लेखापरीक्षकांनी ही तपासणीनंतर

स्वाक्षरी करावी. तपासणीअंती यादीची प्रत संस्थेकडे, संबंधीत बँक शाखेकडे, सहायक निबंधक कार्यालयाकडे, तसेच तपासणी अधिकाऱ्याच्या दप्तरी ठेवण्यात यावी.

१८. कर्ज व्यवहारामध्ये अफरातफर झालेली कर्जखाती, न्यायालयीन प्रक्रीये अधिन असलेली कर्जखाती (वसुली प्रक्रीयेतील वगळून), कलम ८८ चौकशी मधील कर्जखाती, बोगस ७/१२ उताऱ्यावर कर्ज उचल केलेचे निदर्शनास आलेली कर्जखाती यासारखी कर्जखात्यांचा समावेश पोर्टलवर अपलोड करावयाच्या यादीमध्ये करू नये.

१९. उपरोक्त नमुद सूचनांव्यतिरिक्त अन्य शंका /अडचणी जिल्हास्तरीय समिती/ विभागस्तरीय समितीमार्फत या कार्यालयाकडे लेखी स्वरूपात/ ईमेल द्वारे पाठविण्यात याव्यात.

सदर परिपत्रकीय सूचनेची नोंद घेवून विभागाच्या अधिकाऱ्यांनी योजना अंमल बजावणीबाबत आवश्यक कार्यवाही करावी. सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्थ कार्यालये /बँक शाखांना उपलब्ध करून द्यावी.

Taware

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकारआयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. मा. साखर आयुक्त, पुणे.
२. मा. आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर
३. पणन संचालक, पुणे.
४. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, पुणे
५. अपर निबंधक, सहकारी संस्था, मुख्यालय, (सर्व).
६. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन/लेखापरीक्षण) सर्व.
७. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
८. उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य), मुंबई
९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१०. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, सर्व
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. सर्व